# एका खोल समस्येविषयी

डॉ. मनोज भाटवडेकर

**गौरीची समस्या वेगळी होती. त्याला शिक्षक जास्त करून जबाबदार होते. आत्मपरीक्षणाची गरज अनेक व्यावसायिकांमध्ये निर्माण झाली आहे. शिक्षक त्यात बऱ्यापैकी अग्रेसर आहेत.**

''आमच्या गौरीला शाळेच्या मुख्याध्यापिकांबाईंनी पाठवलंय. तुमच्याकडे स्कूल फोबियाची केस आहे म्हणे. 'स्कूल फोबिया' या शब्दांचा अर्थ आम्हा शिकलेल्या पालकांना कळतो. फोबिया म्हणजे अमुक एका गोष्टीची भीती मनात बसणं. बरोबर आहे ना डॉक्टर?''

'बरोबर ती शाळेत जात नाहीये का?'

''नाही जात ती गेले दहा दिवस, पण हा फोबिया नाही डॉक्टर. तिटकारा आहे तिटकारा. 'हेट्रेड फॉर स्कूल' नावाचा काही मनोविकार आहे का तुमच्या शास्त्रात?'

'तुमच्या बोलण्याच्या सुरावरून तुम्ही खूप रागावलेल्या दिसताय.'

''रागावू नको तर काय करू डॉक्टर, प्रश्न काय आहे आणि शाळा उत्तर कुठे शोधतेय तुम्हीच बघा. डॉक्टर, प्रश्न एकट्या गौरीचा नाहीये. गौरीच्या कितीतरी मित्र-मैत्रिणींना शाळेबद्दल प्रचंड तिटकारा वाटतो. गौरी त्यांच्यापेक्षा जास्त संवेदनशील असेल किंवा हट्टी असेल. कदाचित तिने आपला विरोध शाळेत न जाऊन व्यक्त केला. इतर मुलं शाळेत जाऊन अभ्यास न करून तो व्यक्त करत असतील. नाही तर आणखी कुठल्यातरी पद्धतीने व्यक्त करत असतील. शाळेतले कितीतरी शिक्षक असे आहेत की, ज्यांना खरं म्हणजे तुमच्याकडे पाठवण्याची गरज आहे.''

गौरीच्या आईने आपली प्रतिक्रिया तीव्रपणे मांडली असली तरी त्यातल्या मतितार्थाकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नव्हतं.

''मी सांगते तुम्हाला डॉक्टर. तुमच्याशी थोडं बोलल्यावर माझा राग शांत झाला. आता मी जे बोलणार आहे, ते विचारपूर्वक बोलणार आहे. तुम्ही कृपा करून असं समजू नका की, मी हे भावनेच्या भरात बोलतेय. गौरी मुळात बुद्धिमान मुलगी आहे. माझी मुलगी म्हणून नाही सांगत. आता ती सातवीत आहे. तिचा अभ्यासात पहिल्या दहात नंबर असतो. नव्वद टक्क्यांच्या धरात तिचे मार्क कायम असतात. अजूनपर्यंत तिने आपला अभ्यास घसरू दिलेला नाही. तिने मला या शब्दात सांगितलं की, 'आई मी शाळेत न जाताही इतके मार्क मिळवून दाखवीन आणि सध्या दहा दिवस ती मुलगी शाळेत न जाता घरी नियमितपणे अभ्यास करतेय. दुसरं म्हणजे, आपण शाळेत जात नाही आहोत याबद्दल तिच्या मनात काडीचीही खंत नाहीये, तिला आम्ही खूप समजावण्याचा प्रयत्न केला की, शाळेत जाणं आवश्यक आहे. तिने स्पष्टपणे त्याला नकार दिला. स्कूल फोबियाबद्दल आम्ही वाचलंय डॉक्टर. त्यात मुलांच्या मनात शाळेबद्दल भीती असते. ती शाळेत जायला

रडतात, त्यांना कसलीतरी शारीरिक लक्षणं होतात - पोटात दुखतं, डोकं दुखतं, उलट्या होतात वगैरे वगैरे. गौरीचं शाळेत न जाणं हे तिच्या स्वतंत्र विचारसरणीचं लक्षणं आहे, असं मला तरी वाटतं.''

'तिला एवढा तिटकारा निर्माण होण्याचं काय कारण?'

'तिच्या अनेक शिक्षकाचं वर्तन याला जबाबदार आहे. तिच्या गणिताच्या बाई सोडल्या तर बाकी प्रत्येक शिक्षकाबद्दल या मुलांच्या- मी पुन्हा सांगते. गौरीच्या एकटीच्या नाहीत, तिच्या वर्गातल्या जवळजवळ सर्वच मुलांच्या तक्रारी आहेत. तिच्या वर्गशिक्षिका म्हणजे शिक्षक कसा नसावा याचं उत्तम उदाहरण आहेत. त्या त्यांना मराठी आणि समाजशास्त्र शिकवतात. शिकवतात म्हणजे पुस्तकातला धडा एकदा मोठ्याने वाचून दाखवतात. त्यातल्या महत्त्वाच्या वाक्यांखाली खुणा करून घ्यायला सांगतात आणि धड्याखालच्या प्रश्नांची उत्तरं लिहून आणा, असं मुलांना सांगतात. या पद्धतीने त्यांचा तीन महिन्याचा पोर्शन दोन महिन्यांत पूर्ण होतो. मग पोर्शन पूर्ण झाल्याच्या आनंदात त्या रजा घेतात. वर्गातल्या हुशार मुलांचं काही फारसं अडत नाही. पण ज्या मुलांना अभ्यासात अडचणी आहेत, त्यांची खरोखरच पंचाईत होते. त्यांना जर कोणी शंका विचारली तर चक्क गाईड वापरा असं सांगतात. बरं मराठी, इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र असे चार विषय त्या शिकवत असल्यामुळे दिवसातून निदान दोन पिरियड तरी, कधीकधी तीन-चारसुद्धा पिरियड्स त्या वर्गावर असतात. कुठल्याही पालकाला त्या नीट उत्तरं देत नाहीत. उठसूठ मुलांच्या वह्यांवर लाल रंगात शेरे मारलेले असतात. सांगण्यासारखं आणखी बरंच आहे. मी तुम्हाला नुसती झलक दाखवली. इंग्लिशच्या बाई शिक्षा करणं आणि मारणं यासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या तासाला म्हणे चूक झालेली चालत नाही. चुका दुरुस्त करायला शिकवण्याऐवजी या बाई प्रत्येक चुकेगणिक शिक्षा करतात. सायन्सचे सर सांस्कृतिक कार्यक्रमाचेही प्रमुख आहेत. त्यामुळे ते अर्धा वेळ तासाला येतच नाहीत. त्यामुळे त्यांचा पोर्शन कायम मागे राहिलेला असतो. परीक्षेला आठ दिवस राहिले की ते धडाधड पोर्शन संपवल्याचं जाहीर करतात.

''या मुलांना कार्यानुभव नावाचा एक विषय ठेवलेला आहे. त्यात शिवणकाम, विणकाम असे विषय आहेत. उसवलेल्या कापडाला टाका घालणं, बटण लावणं या गोष्टी यायला हव्यात हे मी समजू शकते. पण दोन सुयांचं विणकाम, त्यात उलट टाके-सुलट टाके याचं त्या बाईंनी इतकं प्रचंड स्तोम वाजवून ठेवलंय की, मुलं त्यांच्यापुढे भीतीने थरथरतात. मुलांनी काहीही करून नेलं तरी त्या बाई ते भराभरा उसवून टाकतात आणि शून्य मार्क देतात. चांगलं केलेलं दिसलं तर आईकडून करून घेतलंस का म्हणून उसवतात. व्यायामाचे सर नाही नाही त्या शिव्या देतात. अशा शिक्षकांबद्दल मुलांना आदर, प्रेम वाटावं अशी अपेक्षा करणं बरोबर आहे का? बरं, मी गौरीच्यादेखत कधीही शाळेविरूद्ध, शिक्षकांविरूद्ध बोलत नाही. उगाच आपण तिच्या मनात काही भरवलं असं व्हायला नको. पण हल्ली मुलं स्वतंत्रपणे विचार करतात. त्यांची मतं पक्की असतात. ती कशी बदलणार? तुम्ही याला स्कूल फोबिया म्हणालं का? मी मघापासून स्कूल फोबिया हे एकचं नाव घेऊन बसलेय, असं तुम्हाला वाटत असेल. नावाचं जाऊ द्या गौरीशी तुम्ही बोलून काही उपयोग होईल असं वाटत तुम्हाला डॉक्टर?''

'मला वाटतं, तिच्याशी बोलून म्हणण्यापेक्षा तिला याबाबतीत बोलतं करून उपयोग होईल. तिच्या मनातला राग पूर्ण मोकळेपणाने व्यक्त व्हायला हवा. आपल्या भोवतालच्या मोठ्या माणसांच्या गैर वागण्याला काही कारणं असू शकतात तरीही आपल्याला त्यांच्याशी जमवून घ्यावं लागतं. त्यातून स्वहित कसं साधायचं याबद्दल नंतर तिला समज देता येईल. एवढ्याने प्रश्न सुटणार नाही. अशा तऱ्हेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी खरी गरज आहे ती पालक आणि शिक्षक यांनी मुलांच्या हितासाठी एकत्र येण्याची. काही शाळांमध्ये पालक-शिक्षक संघटना उत्तम काम करताहेत. अशा संघटनांतर्फे मुलांच्या विकासासाठी जसे कार्यक्रम घेतले जातात तसेच पालक आणि शिक्षक यांच्यासाठीही मार्गदर्शनपर कार्यक्रम घेतले जातात. आज अनेक मुलं शिक्षकांच्या गैरवर्तनाचे बळी झालेली आहेत. शिक्षकांचे स्वत:चे म्हणून काही प्रश्न असतीलही.

नाही असं नाही, पण त्याचा परिणाम मुलांना भोगायला लावणं हा त्यांच्यावर अन्याय करण्यासारखं आहे. शिक्षकांसाठी घेतलेल्या कार्यक्रमांमधून अशा तऱ्हेच्या समस्यांबाबत चर्चा होते. त्यातून शिक्षकांचा दृष्टिकोन आणखी प्रगल्भ करता येतो. असा आमचा अनुभव आहे.''

एक व्यावसायिक छायाचित्रकार एका दुष्काळग्रस्त भागात छायाचित्रणासाठी गेला. तिथून परत आल्यावर त्याने आपल्या मित्राला तिथल्या भयानक परिस्थितीचं वर्णन करून सांगितलं. मित्र म्हणाला, ''तू माणूस म्हणून तिथे काय केलंस?'' त्यावर हा म्हणाला, ''काय करणार? मी ज्या कामासाठी गेलो होतो तेच. त्या सगळ्याची छान रंगीत छायाचित्रं काढली. डेव्हलप केल्यावर दाखवीनच.''

व्यावसायिक दृष्टिकोनाचा हा अतिरेक झाला. शिक्षकाला आपला व्यवसाय करताना स्वत:तला 'माणूस' वजा करून चालणार नाही. आत्मपरीक्षणाची गरज अनेक व्यावसायिकांमध्ये निर्माण झाली आहे. शिक्षक त्यात बऱ्यापैकी अग्रेसर आहेत.

**आपलं महानगर दि. २४/२/९८**
**काही बोलायाचे आहे**